# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३२२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०६/२०१८

**१) गळा हाताने दाबुन जिवाने मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद —**

दिनांक १४/०६/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी तुषार रामरतन उके वय ३३ वर्ष, आंबेडकर वार्ड तुमसर यांनी दिनांक १६/०६/२०१८ ला पोस्टे ला दिलेल्या रिपोर्ट ची चौकशी सफौ. मनोहर शहारे ब.न. ३०४ यांनी करुन दि २३/०६/२०१८ ला चौकशी मध्ये यातील आरोपीने सौ. चंद्रकला रामरतन उके वय ६५ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड तुमसर हिचा गळा हाताने दाबुन जिवाने मारण्याचा प्रयत्न केल्याने चौकशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३०७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. म्हसकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) मोटार पंपची चोरी :—**

दिनांक २२+२३/०६/२०१८ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी सोमेश्वर रामचंद्र तितीरमारे वय २२ वर्ष, खैरी याचे नवीन घराचे बांधकाम कामी पाण्याच्या उपयोगाकरीता ०.५ एचपी सिआरआय कम्पनीची मोटार फुटबालसह किंमती ४,०००/—रु. ही शासकीय विहीरीवर लावले असता रात्र दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १३/०४/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा ग्रामपंचायत भोजापुर येथे हजर असतांना यातील आरोपी ही महात्मा गांधी तंटामुक्ती पुरस्काराची माहीती मागण्यास आली असता फिर्यादी यांनी आरोपीस सभा सुरु आहे आपण थोडया वेळाने या असे म्हटलेवर यातील आरोपीने सभागृहात जोराजोरात गोंधळ करुन जोराने बोलायला सुरुवात केली व फिर्यादीस तु मला बाहेर काढणारा कोण हातोस असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी विकाश पुंडलीक निंबार्ते वय ३४ वर्ष, सरपंच ग्रा. पं. भोजापुर यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) नॅनोकारच्या धडकेत एकाचा मृत्यु :—**

दिनांक ०६/०६/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील मृतक नामे यादोवराव गंगाराम भजनकर वय ७० वर्ष, रा. संताजी वार्ड भंडारा हा जलाराम चौक येथुन रोडने जात असतांना ४ व्हीलर नॅनोकार क्र. एमएच ३६/४४३९ च्या आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व लापरवाहीने निष्काळजीपने चालवुन मृतक यास जलाराम चौक भंडारा येथे धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने त्यास औषधोपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्रावरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. काटेखाये यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) बेकायदेशीर रित्या जनावरे कत्तली करीता मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २२/०६/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने स्वतःचे लाभा करीता बेकायदेशीर रित्या गौ हत्या करुन मास विक्री करतांनी तसेच गौमास, वजन काटा, लोखंडी कोयता, लाखडी कुंदा व गौमास जातीचे ८ जनावरे कत्तली करीता जवळ एकुण किंमती २५,३४०/—रु. माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी मपोउपनि. डहाके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४२९ भादवी. सहकलम ५,५(क),७,९(अ) (ब) महाराष्ट्र पशु संवर्धन अधि. १९७६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. डहाके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**६) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन चाकुने पोटावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २२/०६/२०१८ चे २२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. पोर्णिमा खेमराज मुल वय ३० वर्ष रा. मासळ हीचे घरातील मागील बाजुस खिडकी लगत आरोपी यांने ८ दिवसापुर्वी गौताची झांजी तयार केलेली आहे. झांजीचे पाणी फिर्यादीचे घराचे भिंतीवर पडत असते म्हणुन त्यांचे भांडण सुरु आहे फिर्यादी ही आपले घरी हजर असतांना यातील आरोपीतांनी आम्ही पाणी मागे सरकवनार नाही असे बोलुन शिवीगाळ करित असतांना फिर्यादी हिने हटकले असता आरोपी क्र. २ व ३ यांनी लांबाझोबी केली त्या दरम्यान आरोपी क्र. ने भाजीपाला कापण्याचे चाकुने फियादीचे पोटावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी याचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**७) रेडीमेड कपडे व तांदळाच्या बॅगची चोरी :—**

दिनांक २२/०६/२०१८ चे २१.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी जनार्धन केवळराम झिंगरे वय ४६ वर्ष, रा. पंचशिल वार्ड साकोली याने अतीक्रमण जागेवर टिन शेड टाकुन अनाज दुकान व रेडीमेड कपडयाचे दुकान लावले असुन कोणीतरी अज्ञात आरोपीने छताचे टिन वाकवुन आत प्रवेश करुन मयुर कम्पनीच्या तांदळाच्या १० बॅग प्रत्येकी २५ किलो वजनाचे, व्द्ारकाधीस कं. तांदळाच्या ४ बॅग प्रत्येकी २५ किलो वजनाचे, रेडीमेड कपडे असा एकुण २५,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४६१,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**८) टाटा सुमो धडकेत दोन जखमी :—**

दिनांक १७/०६/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी भोजराम मनीराम मेहर वय २२ वर्ष, रा. दहेगांव याने स्वत:चे वाहन क्र. एमएच ४९ बी १२४६ ने चालकासह मोहगांव देवी वरुन भंडाराकडे येत असतांना समोरुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने लापरवाहीने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादी बसलेल्या वाहनाला आमोरासमोर मोहगांव देवी येथे धडक दिल्याने त्यास गंभिर दुखापत व चालाकस किरकोळ दुखापत होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी जखमीचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरुन पो. स्टे भंडारा येथुन प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खोकले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**९) इसमाचा मृत्यु :—**

दिनांक ०९/०६/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील मृतक भाष्कर कुंभराव सोनवाने वय ३४ वर्ष, रा. राणी लक्ष्मी बाई वार्ड भंडारा याला पोटाचा त्रास होवुन प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचाकरता दिनांक ०९/०६/२०१८ ला मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता तेथील डॉ. नी तपासुन मृत घोषीत केल्याने पो. स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपाल व्द्ारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. महालगावे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१३) उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु :—**

दिनांक १३/०६/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. मंदा ज्ञानेश्वर बहेकार वय ४० वर्ष, रा. पळसगाव हिने कोणतीतरी किटक नाशक औषधी प्राशन केल्याने तिला औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपाल व्द्ारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना. मडावी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**१४) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिनांक २२/०६/२०१८ चे २३.३० वाजता दरम्यान यातील मृतक धमरत्न मन्साराम लोनारे वय ३३ वर्ष, रा. दैतमांगली हा सेट्रींगचे काम करीत असतांनी खाली पडल्याने त्यास औषधोपचाराकरीता लक्ष हॉस्पीटल भंडारा येथे केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपाल व्द्ारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना. भुरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफा. संतापे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.